पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

यवतमाळ

वर्ष १, अंक ३५, सोमवार दि. २९ जून २०२६, मूल्य ३ रूपये, पुष्ठे ४

RNI No.- MAMAR/26/A4531 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




## नसरापूर प्रकरण

# भीमराव कांबळेला फाशीची शिक्षा

### 16 दिवसांत आरोपपत्र, 55 हून अधिक साक्षीदार अवघ्या 60 दिवसांत फास्ट ट्रॅक कोर्टाचा ऐतिहासिक निकाल

प्रतिनिधी २९ जून

**पुणे:** पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर पाशवी अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या भीमराव कांबळे (वय ६५) या नराधमाला पुणे जिल्हा व सत्र न्यायालयाने आज (सोमवारी, २९ जून) मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी हा ऐतिहासिक निकाल दिला. विशेष म्हणजे, गुन्हा घडल्यापासून अवघ्या दोन महिन्यांत आणि खटल्याची सुनावणी केवळ १६ दिवसांत पूर्ण करून निकाल देण्यात आलेला हा राज्यातील पहिलाच आणि सर्वात जलदगतीने निकाली लागलेला खटला ठरला आहे.चार दिवसांपूर्वी (२५ जून) न्यायालयाने कांबळेला दोषी ठरवले होते, मात्र शिक्षेचा निर्णय राखून ठेवला होता. आज अंतिम निकाल देताना न्यायाधीशांनी नोंदवलेली निरीक्षणे अत्यंत हादरवून टाकणारी होती.




निकालाचे वाचन करताना विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी आरोपीच्या क्रूरतेवर कठोर शब्दांत ताशेरे ओढले.हत्येनंतरही अत्याचार, फाशीही अपुरीच: 'आरोपीने चिमुकलीला जिवंत राहण्याचा कोणताही पर्याय ठेवला नाही. तिच्यावर अमानुष अत्याचार केले, एवढेच नाही तर हत्येनंतरही त्याने तिच्या मृतदेहावर लैंगिक अत्याचार केले. अशा नराधमाला फाशीची शिक्षा देखील अपुरीच आहे. 'मुलीच्या अंगावर तब्बल १८ जखमा होत्या. तिचा श्वास कोंडण्यासाठी तिची पँट तिच्या तोंडात २१ सेंटीमीटर आत कोंबण्यात आली होती. असहाय्य मुलीने अतोनात वेदना सहन केल्या. विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी या प्रकरणात आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या १२ निकालांचे दाखले दिले. या सर्व निकालांचे नसरापूरच्या घटनेशी साधर्म्य होते.न्यायाधीशांनी अंतिम निकाल देताना 'निर्भया प्रकरण', 'बशर अली केस', 'शंकर खाडे केस' आणि 'बच्चन सिंग विरुद्ध स्टेट ऑफ पंजाब' या प्रकरणांचे दाखले दिले.'शांत डोक्याने कट रचून केलेली हत्या, गुन्ह्यातील क्रूरता आणि या घटनेमुळे समाजाला बसलेला धक्का हे सर्व घटक फाशीच्या शिक्षेसाठी पात्र ठरतात. स्वतःची वासना पूर्ण करण्यासाठी असहाय्य बालिकेसोबत केलेले हे कृत्य अमानवी आहे,' असे न्यायालयाने स्पष्ट केले. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या १६ दिवसांत पोलिसांनी भक्कम आरोपपत्र दाखल केले.

### १ मे रोजी घडली होती घटना

१ मे रोजी नसरापूर येथे सुमारे ३९ मिनिटांच्या कालावधीत आरोपीने साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर पुण्यासह राज्यभरात संताप व्यक्त झाला होता. विविध ठिकाणी आंदोलने झाली आणि आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली. राज्य सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेत खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्याचा निर्णय घेतला. पुणे ग्रामीण पोलिसांनी अवघ्या १६ दिवसांत आरोपपत्र दाखल केले. त्यानंतर न्यायालयात वेगाने सुनावणी पार पडली. या खटल्यात ५५ हून अधिक साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली असून सीसीटीव्ही फुटेजसह विविध तांत्रिक पुरावेही न्यायालयासमोर सादर करण्यात आले. आजच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा व सत्र न्यायालयाबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. न्यायालय परिसरात नागरिकांचीही मोठी गर्दी झाली.

### ५० हून अधिक साक्षीदारांची नोंदविली साक्ष

पोलिसांनी गुन्ह्याचा गतीने तपास करत अवघ्या १५ दिवसांत एक हजार २०० पानी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. विशेष न्यायालयाने २१ मेपासून या प्रकरणाची दैनंदिन सुनावणी सुरू केली होती. सरकारी पक्षाने मुलीचे कुटुंबीय, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पंच, तपास अधिकारी, न्यायवैद्यकीय तज्ज्ञ आणि डीएनए विश्लेषक यांच्यासह ५०हून अधिक साक्षीदारांची साक्ष नोंदवली आहे. शनिवार, २० जून रोजी दोन्ही बाजूंचे अंतिम युक्तिवाद पूर्ण करण्यात आले.

उन्हाळ्याच्या सुट्टीतही कोर्टाने या खटल्याला पूर्ण वेळ दिला. ५५ साक्षीदार तपासले गेले. डॉक्टर, सायबर तज्ज्ञ आणि फॉरेन्सिक टीमने वाखाणण्याजोगी कामगिरी केली. पोलिसांनी उत्कृष्ट तपास केल्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

# काँग्रेस नगरसेविकेच्या पतीच्या एन्ट्रीने स्थायी समितीत राडा





प्रतिनिधी २९ जून

**अकोला:** अकोला महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभेत आज अभूतपूर्व गोंधळ आणि हाय ड्रामा पाहायला मिळाला. काँग्रेसच्या एका नगरसेविकांच्या पतीने नियमांना बगल देत थेट स्थायी समितीच्या सभागृहात प्रवेश केल्याने सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. या गंभीर सुरक्षा चुकीची दखल घेत प्रशासनाने तातडीने महापालिकेच्या दोन सुरक्षा रक्षकांना निलंबित केले आहे. दरम्यान, या गोंधळामुळे संतप्त झालेल्या स्थायी समिती सभापतींनी, 'महापालिकेत जुना 'विजय अग्रवाल' जिवंत करू नका!' असा कडक इशारा दिल्याने पालिका वर्तुळात राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्थायी समितीची महत्त्वपूर्ण बैठक सुरू असताना काँग्रेसच्या एका नगरसेविकांच्या पतीने थेट सभागृहात प्रवेश केला. स्थायी समितीच्या नियमांनुसार, चालू सभेत केवळ सदस्य आणि संबंधित अधिकाऱ्यांनाच प्रवेशाची मुभा असते. मात्र, बाहेरील व्यक्तीने, त्यातही नगरसेविकांच्या पतीने थेट आत येऊन हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याने भाजप आणि सत्ताधारी सदस्य आक्रमक झाले. सभागृहातील गोंधळ अनावर होत असताना स्थायी समिती सभापतींनी थेट आक्रमक पवित्रा घेतला. मला जुना 'विजय अग्रवाल' जिवंत करायला लावू नका. जर कायदे आणि शिस्त पाळली गेली नाही, तर माझ्या स्टाईलने उत्तर दिले जाईल.'

### दोन सुरक्षा रक्षक तडकाफडकी निलंबित

स्थायी समितीसारख्या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वपूर्ण बैठकीच्या ठिकाणी बाहेरील व्यक्ती मुख्य दरवाजातून आत कशी आली? यावर प्रशासकीय पातळीवर मोठी खळबळ उडाले. या सुरक्षा त्रुटीची तात्काळ दखल घेत महानगरपालिका आयुक्तांच्या सूचनेवरून दोन सुरक्षा रक्षकांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. ड्युटीवर असताना हलगर्जीपणा केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला असून, यापुढे अशा प्रकारची पुनरावृत्ती झाल्यास अधिक कडक कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

### राजकीय वातावरण तापले

या घटनेमुळे अकोला मनपातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. नगरसेविकांच्या पतीचा प्रशासकीय कामातील आणि सभांमधील हस्तक्षेप नवीन नसला, तरी थेट स्थायी समितीत घुसखोरी करण्याच्या या प्रकारामुळे विरोधक बॅकफूटवर आले आहेत, तर सत्ताधाऱ्यांनी या मुद्द्यावरून काँग्रेसला घेरण्याची रणनीती आखली आहे.

### दलित वस्ती निधीच्या मुद्द्यावरून वाद

अकोला महानगरपालिकेत सध्या निधी वाटपाच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण तापले आहे. काँग्रेस नगरसेविका स्मिता कांबळे यांचे पती गजानन कांबळे यांनी महानगरपालिकेच्या कारभारावर आणि निधीच्या वितरणावर तीव्र आक्षेप घेतला आहे. वॉर्डांच्या विकासासाठी प्रत्येक सदस्याला समान निधी मिळायला हवा, अशी मागणी कांबळे यांनी केली आहे.

# पीएम मोदींच्या मंत्रिमंडळात ७ नेत्यांना लागणार लॉटरी!

वृत्तसंस्था २९ जून

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात मोठा फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पावसाळी अधिवेशनापूर्वी ७ नव्या चेहऱ्यांना मंत्रिपदाची संधी मिळू शकते, तर काही मंत्र्यांच्या खात्यांमध्ये बदल होण्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. केंद्र सरकारकडून अद्याप मंत्रिमंडळ फेरबदलाची अधिकृत तारीख जाहीर करण्यात आलेली नसली, तरी हा निर्णय उद्या म्हणजेच मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परदेश दौऱ्यानंतर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

संसदेचे पावसाळी अधिवेशन १८ जुलैपासून सुरू होत असून त्यापूर्वी मोठी राजकीय घोषणा होऊ शकते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांनंतरचा हा पहिलाच मंत्रिमंडळ फेरबदल असल्याने त्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. फेरबदलात कोणाला संधी मिळणार याबाबत अद्याप स्पष्टता नसली, तरी काही नावांची जोरदार चर्चा सुरू आहे. भाजप खासदार अरुण गोविल, शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे, आरबीआयचे माजी गव्हर्नर शक्तिकांत दास, बिहारचे माजी मुख्यमंत्री नितीश कुमार, संजय दिना पाटील, व्ही. डी. शर्मा, तरुण चुघ आणि राघव चड्ढा यांना मंत्रिमंडळात स्थान मिळू शकते, अशी चर्चा आहे. दरम्यान, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे नावही चर्चेत असून त्यांच्या खात्यात बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याशिवाय रवनीत सिंग बिट्टू आणि हरदीप सिंग पुरी यांच्या जबाबदाऱ्यांमध्येही फेरबदल होऊ शकतो.




# पाकिस्तानचे अफगाणिस्तानवर भीषण हवाई हल्ले!

वृत्तसंस्था २९ जून

**इस्लामाबाद :** कराची येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्याच्या नावाखाली पाकिस्तानने रविवारी आणि सोमवारच्या दरम्यानच्या रात्री सुमारे १२:३० वाजता अफगाणिस्तानच्या तीन प्रांतांवर भीषण हवाई हल्ला केला. पाकिस्तान सरकारने असा दावा केला आहे की, त्यांनी 'तहरीक-ए-तालिबान' (ऊऊझ्) आणि 'जमात-उल-अहरार' या दहशतवादी संघटनांच्या अड्ड्यांवर हल्ले केले आहेत. मात्र, अफगाणिस्तानमधून समोर आलेल्या भीषण चित्रांनी पाकिस्तानचा खोटारडेपणा पुन्हा एकदा उघडा पाडला आहे. पाकिस्तानने नेहमीप्रमाणे या वेळीही निवासी भागांना लक्ष्य केले असून, यामध्ये ३५ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, तर १०० हून अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत.






## उड्डाणपुलावरील घाण पाण्यामुळे नागरिक त्रस्त

**अकोला :** शहरातील रेल्वे स्टेशन ते अशोक वाटिका चौकादरम्यानच्या उड्डाण पुलावरील घाण पाणी या मार्गावरून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनधारकांच्या अंगावर पडत असल्यामुळे त्यांना त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे उड्डाण पुलावरील आउटलेटचे पाइप अनेक दिवसांपासून फुटलेले असून, ते पावसाळ्यापूर्वी दुरुस्त करणे आवश्यक होते. मात्र ते दुरुस्त न करण्यात आल्यामुळे नागरिकांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. हे पाणी घाण असल्यामुळे संपूर्ण कपड्यांना दुर्गंधी सुटत असल्याने नागरिकांना सर्व कामधंदे सोडून घरी जाऊन कपडे बदलून यावे लागत आहे. याबाबत दखल घेऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# भटक्या-विमुक्तांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने अधिक जबाबदारी वाढली

## मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड



ही केवळ नियुक्ती नाही, तर देशभरातील २५ कोटी विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या समाजाच्या न्याय, हक्क आणि सक्षमीकरणासाठीची मोठी जबाबदारी आहे,' अशा शब्दांत नवनियुक्त राष्ट्रीय अध्यक्ष तथा मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड यांनी आपले मत व्यक्त केले.

शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व शिवसेना युवा नेते खासदार श्रीकांत शिंदे यांनी देशभरात खितपत पडलेल्या व अजूनही राहायला घर नसलेल्या भटक्या व विमुक्त जातीच्या उत्थानासाठी भरीव कार्य करण्याची इच्छा बोलून दाखवली. 'मी त्या समाज घटकातून येत असल्यामुळे आणि त्या प्रश्नाची जाण असल्यानेच माझ्यावर मोठ्या विश्वासाने जबाबदारी टाकली असावी. माझी ही नियुक्ती अभिमानाची असली तरी कर्तव्य पूर्ण करण्याची आहे,' असे ना. राठोड यांनी नियुक्तीनंतर झालेल्या मुलाखतीत सांगितले.

आज हा समाज देशभर झोपड्या व पालांमध्ये राहतो. अजूनही बहुतांश लोकांकडे साधे ओळखपत्र नाही. त्यामुळे सर्वांना सोबत घेऊन आमच्या नेत्यांना अभिप्रेत असे काम करायचे आहे, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली. शिंदे साहेबांच्या मनात दुर्लक्षित समाज मुख्य प्रवाहात आला पाहिजे नियुक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना ना. राठोड म्हणाले, 'मा. एकनाथराव शिंदे साहेबांच्या मनात हा दुर्लक्षित समाज मुख्य प्रवाहात आला पाहिजे व त्यांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात योग्य प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, ही अत्यंत स्पष्ट आणि ठाम भूमिका आहे. मी स्वतः बंजारा समाजातून येत असल्यामुळे माझ्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.'

**'स्वातंत्र्यसैनिकांचे वंशज आहोत'**

'आम्ही गुन्हेगार नाही, आम्ही स्वातंत्र्यसैनिकांचे वंशज आहोत. आम्ही भटके नाही, आम्ही भारत घडवणारे आहोत,' असे स्पष्ट करून ते पुढे म्हणाले, 'ब्रिटिश काळात आमच्या समाजाने ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले होते. म्हणूनच त्याकाळी १८७१ चा गुन्हेगारी कायदा लावून सेटलमेंटमध्ये ठेवले होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तब्बल पाच वर्षांनी आम्ही विमुक्त झालो, परंतु त्यावेळी या समाजाचे पाहिजे तसे पुनर्वसन झाले नाही.' 'नंतर १९६५ मध्ये मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या काळात 'टीएनटी'साठी प्रवेश व नोकरीमध्ये ४ टक्के राखीव जागा ठेवण्याचा निर्णय घेतला गेला. आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या. पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या कार्यकाळात 'ओबीसी 'संवर्गासाठी मंडल आयोग नेमला. त्या आयोगातील एक सदस्य श्री. एल. आर. नाईक यांनी या समाजासाठी स्वतंत्र राखीव जागा ठेवल्या पाहिजे. भटक्या-विमुक्त समाज ध्ँण मधील जातींबरोबर स्पर्धा करू शकणार नाही, असे या अहवालात त्यांनी 'डिसेंट नोट' लिहिली आहे.' यानंतर बाळकृष्ण रेणके यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला. त्यानंतर भिकू इधाते आयोग नेमला. दोन्ही आयोगांनी केंद्र सरकारला अहवाल सुपूर्द केला, परंतु शिफारशी स्वीकारल्या नाहीत. नंतर रोहिणी आयोग नेमला गेला. याबाबत सर्वसमावेशक बैठक घेऊन भूमिका ठरवू. भटके-विमुक्त समाजातील ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते, विचारवंत यांच्याशी विचारविनिमय करू,' असेही ना. संजय राठोड यांनी सांगितले.

### २५ कोटींचा समाज, पण वंचितच

देशात भटक्या-विमुक्त समाजाची संख्या अंदाजे २५ कोटी तर महाराष्ट्रात सुमारे २ कोटी आहे. बंजारा, पारधी, बेरड, बेस्तर, भामटा, कंजारभाट, पारधी, पालपारधी, राजपारधी, रामोशी, वाघरी, छप्परबंद, वडार, कैकाडी, गोसावी, भराडी, भुते, चित्रकथी, गोंधळी, गोपाळ, हेळवे, जोशी, काशीकापडी, मसनजोगी, मैराळ, पांगुळ, रावळकोल्हाटी, डोंबारी, नंदीवाले, वैदू, वासुदेव, भोई, बहुरूपी, ओतारी, मरीआईवाले, कडकलक्ष्मीवाले, मरगम्मावाले, गिहरा/ गहरा, गुसाई/गोसाई, मदारी, गारुडी, सापवाले व जादूगार, गवळी, दरवशी, अस्वलवाले, बागडी, बेलदार, शिकलगार यांसह अनेक जाती जमातींचा या प्रवर्गात समावेश होतो. हा समाज केवळ संख्येने मोठा नाही, तर देशाच्या सामाजिक व सांस्कृतिक संरचनेतील महत्त्वाचा घटक आहे.

मात्र आजही हा समाज शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवास, जातप्रमाणपत्र आणि मूलभूत सुविधांपासून वंचित आहे,' अशी खंत ना. संजय राठोड यांनी व्यक्त केली.

### इतिहास आणि संघर्ष

१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात इंग्रजांविरुद्ध लढल्यामुळे ब्रिटिशांनी १८७१ मध्ये 'ऐग्स्र्हेंत्ऊेगे ॅमू' लावून या समाजाला जन्मजात गुन्हेगार ठरवले. १९५२ मध्ये पंडित नेहरूंनी हा काळा कायदा रद्द केला. तोच आमच्या समाजाचा दुसरा स्वातंत्र्य दिन आहे,' असे ते म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील प्रमुख हेर बहिर्जी नाईक, चित्रकथी समाजाचे दौलतराव भोसले, तसेच मुख्यमंत्रीपदी पोहोचलेले वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक यांच्या कार्याचा उल्लेख करत राठोड यांनी, 'त्यांनी आश्रम शाळा सुरू केल्या नसत्या तर आपण इथपर्यंत आलोही नसतो,' अशी कृतज्ञता व्यक्त केली.

### पुढील दिशा: संघटन, सक्षमीकरण, प्रतिनिधित्व

नियुक्तीनंतरचा रोडमॅप स्पष्ट करताना ना. राठोड म्हणाले, 'माझी पहिली प्राथमिकता म्हणजे विमुक्त-भटके समाजाचे संघटन मजबूत करणे. प्रत्येक राज्य, जिल्हा आणि तालुक्यात संघटन उभे करून युवक, महिला व सुशिक्षित वर्गाला नेतृत्वात आणणार.' 'शिक्षण, रोजगार, आरक्षण, जातप्रमाणपत्र आणि मूलभूत सुविधा या प्रश्नांवर शासन स्तरावर पाठपुरावा करावा लागेल. घरांसाठी स्वतंत्र गृहनिर्माण योजना, वसतिगृहे, शिष्यवृत्ती वाढवू आणि जात प्रमाणपत्राची प्रक्रिया सोपी करू,' असे ठोस आश्वासन त्यांनी दिले.

### 'ही नियुक्ती निवडणुकीसाठी नाही'

राजकीय हेतूबद्दल विचारलेल्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका मांडताना ते म्हणाले, 'ही नियुक्ती कोणत्याही निवडणुकीसाठी नाही. अनेक वर्षे दुर्लक्षित राहिलेल्या विमुक्त व भटक्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही जबाबदारी दिली आहे. विरोधकांचे काम बोलणे आहे, आमचे काम परिणाम देणे आहे. आम्ही कामातून उत्तर देऊ.'

### 'मी सर्वांचा प्रतिनिधी'

'बंजारा समाजाला जास्त प्राधान्य मिळेल का?' या प्रश्नावर ते ठामपणे म्हणाले, 'तसे काही नाही. भटक्या-विमुक्त जातीमधील प्रत्येक समाज माझ्यासाठी समान आहे. मी संपूर्ण विमुक्त, भटक्या आणि अर्धभटक्या समाजाचा प्रतिनिधी म्हणून काम करणार आहे.'

**मोहन राठोड**
निवृत्त माहिती संचालक, पुणे

---

# आज संत कबीर यांची जयंती
# संत कबीर यांच्या उलटबांसिया



(उलटबांसिया म्हणजे संत कबीर यांनी वापरलेली एक काव्यशैली)

**संत कबीर यांची शिकवण :** स्वरूपज्ञान हेच खरे ! एक साधक म्हणून संत कबीर यांची शिकवण वाचताना एक गोष्ट मनात प्रार्थमिकच जेवढी स्पष्ट असेल तेवढे चांगले. ती म्हणजे संत कबीर 'स्वरूपज्ञान हेच एकमेव जीवनध्येय', असे कशाशीही तडजोड न करता सांगतात. ते सांगतात, 'सामान्यांनी व्यावहारिक जीवनात फसून न जाता आध्यात्मिक जीवनाकडे येत साधक बनावे आणि साधकाने स्वरूपज्ञान हेच एकमेव ध्येय ठेवून साधना करावी.'

**भक्ती आंदोलनातील संत कबीर यांचे योगदान :** उत्तर भारतीय समाजावर इस्लामचे आक्रमण होत असतांना ज्या भक्ती आंदोलनाने त्याला बोथट केले आणि या भूमीतील सनातन संस्कृती उत्तम प्रकारे राखली, त्यात संत कबीर यांनी सिंचित केलेल्या निर्गुण भक्तीचा मोठा वाटा आहे. त्यांनी या भक्तीच्या आधारे सामान्यांना त्यांचा आंतरिक परिचय करून देत आत्मबल वाढवल्याने जणू बाह्य आक्रमणापासून रक्षण करणारी तटबंदीच सामान्यांच्या भोवती सिद्ध झाली. संत कबीर यांच्या कार्यात त्यांच्या काव्यरचनांचा पुष्कळ मोठा वाटा आहे. आजही साधक असलेले आणि नसलेले यांना संत कबीर यांची एखादी ओळ तरी ठाऊक असते, यांतच सर्व काही आले. यादृष्टीने त्यांच्या रचनांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. पुढे संत कबीर यांच्या काही काव्यपंक्ती, त्यांचा शब्दार्थ आणि नंतर भावार्थ दिला आहे. वाचतांना प्रत्येक टप्प्याला आपल्या मनाची स्थिती कशी असते, ते पहावे.

मच्छ शिकारी रमे जंगल में, सिंह समुद्रहीं झूला।

**शब्दार्थ :** मासा जंगलात फिरत आहे, (त्याच्या भीतीपायी) सिंह समुद्रात जाऊन बसला आहे.

**भावार्थ :** माया (मासा) शिकारी बनून संसारवनात शिकार करत आहे. त्यामुळे जीव (सिंह) भ्रमरूपी समुद्रात जाऊन बसलेला आहे (कारण त्याला स्वरूपज्ञान नाही).

खसमहि छाडि ससुर संग गौनी,
सो किन लेहु बिचारी।

**शब्दार्थ :** एक स्त्री आपल्या पतीला सोडून सासऱ्यासमवेत पळून गेली.

**भावार्थ :** माया-मनोवृत्ती आत्मविचाराला (आत्मा म्हणजे पती) सोडून अहंकाररूपी सासऱ्यासह पळून जाते.

पानिं माहिं तलफी गई भूंभरी,
धुरि हिलोरा देई।

**शब्दार्थ :** पाण्यात तप्त वाळू तळमळत होती, त्यातून धुराची तरंगे येऊ लागली.

**भावार्थ :** शीतल वृत्त आत्म्याच्या सान्निध्यात असूनही मनोवृत्ती चिंताग्नीत सतत जळत रहाते आणि मग त्यातून विविध इच्छा-कल्पना यांच्या लहरी निघत रहातात.

एक अचंभा देखा रे भाई,
ठाढ़ा सिंह चरावै गाई।

**शब्दार्थ :** मी एक मोठा चमत्कार पाहिला, एक सिंह उभा राहून गायींना (शेळ्या-मेंढ्यांप्रमाणे) चरायला नेत आहे.

**भावार्थ :** साधना जेव्हा गती पकडते, तेव्हा माणसाचा हिंस्र अहंकार नियंत्रणात येऊन तोच अहंकार आणि तीच ऊर्जा आता ज्ञानेंद्रियांना योग्य मार्गावर चालवण्यासाठी (चरावण्यासाठी) रक्षक बनते.

पहिले पूत पिछे भई माई।

**शब्दार्थ :** आधी मुलाचा जन्म झाला आणि नंतर आई जन्माला आली !

**भावार्थ :** जोपर्यंत ज्ञान (मुलगा) जन्माला येत नाही, तोपर्यंत या सृष्टीला चालवणारी माया (आई) कोण आहे, हे समजतच नाही.

बैल बियाय गाय भइ बंझा,
बछरू दुहिये तिन तिन संझा।

**शब्दार्थ :** बैल व्याले, त्यांना बछडे झाले, गाय वांझ झाली. बछड्यांचे ३ वेळा दूध काढले जात आहे.

**भावार्थ :** (बैल) अविवेकाकडून षड्रिपूंचे (बछडे) प्रजनन होत आहे; परंतु सद्बुद्धी (गाय) वांझ बनली आहे. षडरिपूंनिर्मित सृष्टीचे रसपान सतत होत आहे.

कहहि कबीरा बुढ़िया आनन्द गाय,
पूत, भतारहिं बैठी खाय।

**शब्दार्थ :** कबीर म्हणतो, म्हाताऱ्या आनंद गायीने सर्व मनुष्यांना खाऊन टाकले आहे.

**भावार्थ :** गाय म्हणजे माया.

**अ. 'खिचडी' भाषा :** संत कबीर यांनी स्वतःचे विचार मांडण्यासाठी सर्वसामान्यांची भाषा निवडली. ज्यामध्ये अवधी, ब्रज, भोजपुरी, पंजाबी आणि फारसी शब्दांचे मिश्रण होते.

**आ. धक्कादायक शब्दार्थ :** शब्दार्थ पाहिल्यास नित्य अनुभव, अपेक्षा, समजूती यांना धाब्यावर बसवत अनाकलनीय, विचित्र, कल्पनेच्याही बाहेरचे, असे काही सांगितल्याचे लक्षात येते.

**इ. गहन भावार्थ :** शब्दार्थाचा भावार्थ पाहिल्यास अनपेक्षित गहन सत्य समोर येते. ते विचार करायला लावते. अमूर्त आणि थोडे अस्पष्ट असे वाटले, तरी ते मनाची पकड घेत 'जे म्हटले ते योग्य आहे', हे स्वीकारायला भाग पाडते. अशा प्रकारच्या रचनांना उलटबांसिया, म्हणजेच 'उलटीवाणी' असे म्हणतात. येथे सर्वसामान्य अनुभवाच्या पूर्ण विरोधी आणि विचित्र असे सूत्र मांडले असूनही त्यातील गहन सत्यापायी ते पूर्ण स्वीकारावे लागते.

**उलटबांसियांचा प्रभाव.**

उलटबांसिया हे संत कबीर यांच्या रचनांचे एक विशेष वैशिष्ट्य आहे. गेल्या ५० वर्षात संत कबीर यांच्या रचनांकडे 'एक मोठा ठेवा', असे पहात देशविदेशात संशोधन झाले आहे. गेली अनेक शतके या उलटबांसिया सामान्यांना नित्य जीवनातून आध्यात्मिक जीवनाकडे जाण्यासाठी आणि साधकांना साधनेसाठी प्रेरणा देत आहेत. संत रचित वचने असल्यामुळे त्यात आध्यात्मिक सामर्थ्य आहेच.

**डॉ. दुर्गेश सामंत**
गोवा.

---

# सामाजिक, आर्थिक नियोजन अन् धोरणात आकडेवारीचे अनन्यसाधारण महत्व



आज राष्ट्रीय सांख्यिकी दिन

भारतात दरवर्षी २९ जून रोजी राष्ट्रीय सांख्यिकी दिन साजरा केला जातो. देशाचे महान सांख्यिकीशास्त्रज्ञ प्रा. प्रशांत चंद्र महालनोबिस यांच्या जयंतीनिमित्त, सामाजिक-आर्थिक नियोजन आणि धोरणनिर्मितीत आकडेवारीचे (डेटा) महत्त्व अधोरेखित करण्यासाठी हा दिवस पाळला जातो.

भारत सरकारने २९ जून २००७ रोजी पहिल्यांदा राष्ट्रीय सांख्यिकी दिन साजरा केला. तरुण पिढीला धोरण आखणीमध्ये सांख्यिकीच्या (आकडेवारीच्या) भूमिकेबद्दल जागरूक करणे. प्रा. प्रशांत चंद्र महालनोबिस यांचे योगदान प्रा. महालनोबिस यांना 'भारतीय सांख्यिकीचे जनक' मानले जाते.त्यांनी १९३१ मध्ये कोलकाता येथे 'भारतीय सांख्यिकी संस्थेची' स्थापना केली.भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा (१९५६-१९६१) आराखडा त्यांनीच तयार केला होता, ज्याला 'महालनोबिस प्रारूप' म्हणून ओळखले जाते. निर्णय घेण्यासाठी डेटा किंवा आकडेवारी किती महत्त्वाची आहे, हे या दिवशी विविध कार्यक्रमांद्वारे पटवून दिले जाते. देशाचा विकास, दारिद्र्य निर्मूलन, कृषी आणि उद्योग क्षेत्रातील योजनांची आखणी अचूक आकडेवारीवर अवलंबून असते.

प्रसंत चंद्र महालनोबिस यांच्या सन्मानार्थ भारतात २९ जून रोजी संख्याशास्त्र दिन साजरा केला जातो. प्रशांत चंद्र महालनोबिस हे भारतीय संख्याशास्त्रज्ञ होते. त्यांनी भारताचा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत (१९५६-६१) उद्योगीकरणाची रचना तयार केली, ज्याला 'महालनोबीस प्रारूप' असे म्हणतात. महालनोबिस यांनी दोन सामग्री संचांची तुलनात्मक गणना करण्यासाठी मापन तयार केले, ज्यास 'महालनोबिस अंतर गणना' म्हणून ओळखले जाते. तसेच त्यांनी वेगवेगळ्या गटातील लोकांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीची तुलना करण्यासाठी 'भाजक आलेखी विश्लेषण' ही संख्याशास्त्रीय पद्धत तयार केली. आर्थिक नियोजन व संख्याशास्त्रीय विकास या क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन भारत सरकारने २९ जून हा त्यांचा जन्मदिन 'संख्याशास्त्र दिन' म्हणून घोषित केले. राष्ट्रीय पातळीवर दरवर्षी हा दिवस 'संख्याशास्त्र दिन' म्हणून विशेष दिन साजरा केला जातो.

राष्ट्रीय सांख्यिकी दिनाचा पहिला सोहळा २००७ साली पार पडला आणि तेव्हापासून तो एक वार्षिक कार्यक्रम बनला आहे. राष्ट्रीय विकासात अधिकृत सांख्यिकीचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी विविध परिसंवाद, चर्चा आणि स्पर्धा आयोजित केल्या जातात. दैनंदिन जीवनात सांख्यिकी सोहळा करण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि धोरण निर्मिती व अंमलबजावणीमध्ये सांख्यिकी कशी मदत करते याबद्दल जनतेला माहिती देणे. सांख्यिकी आणि आर्थिक नियोजन क्षेत्रातील प्रा.पी.सी. महालनोबिस यांच्या अमूल्य योगदानाचा गौरव करण्यासाठी सामाजिक-आर्थिक नियोजनात सांख्यिकीच्या भूमिकेबद्दल जनतेमध्ये, विशेषतः तरुणांमध्ये, जागरूकता निर्माण करणे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय सर्व अहवाल, कार्यक्रम, अंमलबजावणी आणि देखरेख यांचे व्यवस्थापन करते.

### प्रशांत चंद्र महालनोबिस - एक संक्षिप्त विहंगावलोकन

२९ जून १८९३ रोजी कलकत्त्यात एका सधन, विद्वान बंगाली कुटुंबात जन्मलेल्या महालनोबिस यांनी पदवीसाठी भौतिकशास्त्राचा अभ्यास केला. तो पुढील शिक्षणासाठी लंडनला गेला, त्याने भौतिकशास्त्रातील ट्रायपोस पूर्ण केले आणि मानववंशशास्त्र व हवामानशास्त्रातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सांख्यिकीची परिणामकारकता शोधून काढली. त्यांच्या प्रमुख योगदानांमध्ये प्रेसिडेन्सी कॉलेजमधील सांख्यिकी प्रयोगशाळेची स्थापना, कलकत्त्यातील भारतीय सांख्यिकी संस्थेची स्थापना आणि लोकसंख्येची तुलना व गटवारी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या महालनोबिस अंतराचा बहुलवीय मापनाचा विकास यांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणावरील नमुना सर्वेक्षणाच्या क्षेत्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्यासाठी त्यांना अनेक पुरस्कार आणि प्रतिष्ठेचे किताब मिळाले, ज्यामध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठाकडून वेल्डन मेमोरियल पुरस्कार, यूएसएसआरच्या विज्ञान अकादमीचे परदेशी सदस्यत्व, श्रीनिवास रामानुजन सुवर्णपदक, दुर्गाप्रसाद खैतान सुवर्णपदक आणि पद्मविभूषण यांचा समावेश आहे. अग्रणी भारतीय सांख्यिकीशास्त्रज्ञ प्रशांत चंद्र महालनोबिस यांचे २८ जून १९७२ रोजी कलकत्ता येथे वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले.

---

# हिंदू देवस्थान संपत्ती बिल काळाची गरज

हिंदू धर्मियांचे श्रद्धास्थान व आदर्शांचे, संस्कृतीचे आणि जीवनमूल्यांचे प्रतीक म्हणून ज्यांना ओळखले जाते त्या 'मर्यादा पुरुषोत्तम' रामाच्या मंदिराला मिळालेल्या कोट्यवधी रुपयांच्या दानाची चोरी पुजारी व राममंदिर ट्रस्टच्या लोकांनी केल्याचे उघड झाल्यामुळे देशात प्रचंड खळबळ माजली आहे. देवाच्या नावाने मंदिरात मिळालेल्या संपत्तीच्या होत असलेल्या चोऱ्या व लुटीच्या पार्श्वभूमीवर डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी १९३१-३२ मध्ये मध्यप्रांत व वऱ्हाडच्या कायदेमंडळात मांडलेल्या हिंदू देवस्थान संपत्ती बिलाची आणि त्यांच्या द्रष्टेपणाची प्रकर्षाने आठवण येत आहे.

### डॉ. पंजाबराव देशमुखांचे कार्य :

महान शिक्षणतज्ज्ञ, द्रष्टे नेते, शेतकरी कष्टकरी वर्गाचे उद्धारक, थोर समाजसुधारक आणि स्वतंत्र भारताचे पहिले केंद्रीय कृषिमंत्री तथा संविधान सभेचे ज्येष्ठ सदस्य डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी कृषी, शिक्षण आणि सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात अभूतपूर्व कार्य केले. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी १९२७ मध्ये अमरावतीच्या अंबादेवी मंदिरात अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला होता. त्यांच्या या सत्याग्रहाला स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते.

डॉ. भाऊसाहेब देशमुख स्वतः शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या परिस्थितीची आणि तो दारिद्र्यामुळे सावकाराच्या पाशात अडकला असल्याची जाणीव होती. म्हणूनच त्यांनी शेतकऱ्यांना सावकाराच्या पाशातून मुक्त करण्यासाठी सावकारी नियंत्रण कायदा केला आणि सावकारांच्या कर्जाला पर्याय म्हणून ग्रामीण भागात सहज आणि सुलभ कर्ज मिळण्यासाठी सहकारी चळवळीला मोठे बळ दिले. सामान्य आणि वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचावे या उद्दात्त हेतूने त्यांनी १९३२ मध्ये अमरावती येथे श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापन केली.

भारताचे कृषिमंत्री म्हणून त्यांनी शेतीला आधुनिक तंत्रज्ञानांची जोड दिली. कृषी शिक्षण व विकास आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी कृषी क्षेत्रात अनेक मूलभूत सुविधा उपलब्ध करून त्यांच्या सक्षमीकरणासाठी आयुष्यभर लढा दिला. म्हणूनच त्यांना शिक्षणमहर्षी, कृषिरत्न, कृषी क्रांतीचे प्रणेते म्हणून गौरविण्यात येते.

### हिंदू देवस्थान संपत्ती बिल:

भारतीय समाज खूप देवभोळा असून अंधश्रद्धेने ग्रस्त आहे, म्हणूनच ते देवाधर्माच्या नावावर वेगवेगळे कर्मकांड, पूजा विधी, होम हवन, तीर्थाटन करण्यासाठी आणि विशेषतः देवाच्या नावाने मंदिराला हजारो, कोट्यवधी रुपये दान देण्यासाठी फार मोठा खर्च करतो. लोकांच्या दानातून मंदिराला मिळालेली करोडो रुपयाची संपत्ती पुजाऱ्याच्या घरात जाते याची डॉ. पंजाबराव देशमुखांना जाणीव होती. म्हणून देशातील सर्व मंदिरे सरकारच्या नियंत्रणात असावी आणि देवळात जमा होणारा कोट्यवधी रुपयांचा उपयोग सरकारने शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, दवाखाने उभी करण्यासाठी आणि शेतकरी कष्टकरी वर्गाच्या उन्नतीसाठी उपयोगात आणावा या उद्दात्त हेतूने त्यांनी १९३१-३२ साली मध्यप्रांत आणि वऱ्हाडच्या कायदेमंडळात 'हिंदू देवस्थान संपत्ती बिल' मांडले होते.

### हिंदू देवस्थान बिलाची उद्दिष्टे :

**१) सरकारी नियंत्रण:** देशातील मंदिरांची आणि देवस्थानांची प्रचंड संपत्ती गैरवापरापासून वाचवण्यासाठी सरकारने ती आपल्या ताब्यात घ्यावी, असा या बिलाचा मुख्य उद्देश होता.

**२) शैक्षणिक वापर:** देवस्थानांच्या या अफाट संपत्तीतून व उत्पन्नातून मंदिरांची योग्य व्यवस्था लावून, उरलेला सर्व निधी गोरगरीब जनतेला मोफत शिक्षण देण्यासाठी आणि शैक्षणिक कार्यासाठी वापरला जावा, असा क्रांतिकारी विचार त्यांनी मांडला होता.

**३) दुर्गामी उद्देश :** कोणत्याही प्रकारचा नवा कर न लावता देवस्थानांच्या पैशातून राज्यातील सर्वसामान्य मुलांना दर्जेदार शिक्षण मिळू शकते, हे त्यांनी आकडेवारीसह पटवून दिले होते. तथापि, त्या काळातील विरोधकांनी भोळ्याभाबड्या जनतेला बिलाविरोधात भडकवले. पुरोगामी विचारांचे हे विधेयक नामंजूर झाले होते.

**मंदिरातील संपत्तीचे गौडबंगाल :** अयोध्येतील राम मंदिरातील दानाच्या कोट्यवधी रुपयांच्या चोरीचे घबाड उघड झाले पण देशातील हजारो मंदिरातील संपत्तीचे गौडबंगाल कायम आहे. राम मंदिरातील संपत्तीची चोरी मंदिराची देखभाल व व्यवस्थापन करण्यासाठी स्थापन केलेल्या श्री राम जन्मभूमी तीर्थ ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी केली. म्हणून काही सन्माननीय अपवाद वगळता देशातील अनेक मोठमोठ्या देवस्थानाला मिळालेल्या पैशाच्या देखील अशाच चोऱ्या होत असतील अशी शंका घेण्यास फार मोठा वाव आहे. कारण पुजारी व देवस्थानाचे ट्रस्टी म्हणून कार्य करणाऱ्या लोकांना हिंदू धर्मियांचा सर्वश्रेष्ठ परमेश्वर असलेल्या रामाचीच भीती नाही तर इतर देवांचे काय? आपल्या देशात वेगवेगळ्या देवांची असंख्य मंदिरे आहेत. या मंदिरात भक्तीभावाने आणि श्रद्धेने लोकं दरमहिने दान देतात. हा दान म्हणून मिळालेला पैसा कुठे जातो याचा काहीही हिशेब नाही, त्याबाबत कोणतेही कायदेशीर निर्बंध नाहीत. म्हणजेच देशातील करोडो लोकांनी श्रद्धेने केलेल्या दानाची आणि त्यांच्या श्रद्धेचा निव्वळ बाजार सुरू असून पुजारी म्हणून कार्य करणारे आणि त्यांना पाठीशी घालणारी राजकारणी या पैशाचा अपहार करून स्वतःसाठी वापर करतात. लोकांच्या भावनेशी देणेघेणे नाही. कारण त्यांचा देव मंदिरात किंवा दगडाच्या मूर्तीत नसतो तर देवाच्या नावावर मंदिराला मिळणाऱ्या संपत्तीत असतो.

**प्रा. डॉ.एम.आर. इंगळे**
सेवानिवृत्त प्रोफेसर आणि संविधान प्रचारक तथा विभागीय सचिव डाटा अकोला

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

सोमवार, दि. २९ जून २०२६

http://epaper.citynewssuperfast.com


## सुवासिनींनी वटवृक्षाची केली पूजा

**अकोला:** वटपौर्णिमा हा हिंदू संस्कृतीतील अतिशय पवित्र आणि महत्त्वाचा सण आहे. जो विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि वैवाहिक जीवनातील सुख-समृद्धीसाठी साजरा करतात. हा सण ज्येष्ठ पौर्णिमेला साजरा केला जातो.

शहरातील विविध भागात महिलांनी पूजा केली. ७६ वर्षीय पंचकुलाबाई जगदाड़े यांनी देखील पूजा केली. या व्रताचा उगम माता सावित्रीच्या कथेवरून झाला. यमराजाने जेव्हा सत्यवानाचे प्राण हरण केले, तेव्हा सावित्रीने आपल्या बुद्धीने आणि पतिभक्तीने यमराजाला प्रसन्न करून सत्यवानाचे प्राण परत मिळवले.



# समृद्धी महामार्गावरील भीषण अपघातात एकाच कुटुंबातील पाच ठार !

प्रतिनिधी २९ जून

**अमरावती :** चंद्रपूरवरून अकोला येथे समृद्धी महामार्गाने चारचाकी गाडीने चंद्रपूरमधील जीवने कुटुंबीय येत होते. यावेळी धामणगाव परिसरात मुंबईकडे जाणाऱ्या मार्गिकेवर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कंटेनरला जोरदार धडक दिली. हा अपघात एवढा भीषण होता की कारमधील पाच जणाचा जागीच मृत्यू झाला, गाडी चुराडा झाला आहे. ही घटना २८ जून रोजी सकाळी ११.३० वाजेदरम्यान घडली.




पोलीस स्टेशन दत्तापूर, अमरावती ग्रामीण हद्दीतील समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण रस्ता अपघातात एकाच कुटुंबातील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार, चंद्रपूर येथील जीवने कुटुंबीय चंद्रपूर येथून अकोला येथे मारुती सझकी इग्निस (एमएच ३४ बीएफ १३४६) या चारचाकी वाहनाने समृद्धी महामार्गावरून प्रवास करीत होते. सकाळी अंदाजे ११.३० वाजताच्या सुमारास धामणगाव परिसरातील चॅनेल क्रं.१०४ ते क्रं.१०५, मंबईकडे जाणाऱ्या मार्गिकेवर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कंटेनर (एनएल ०१ एके ७१२३) च्या मागील बाजूस त्यांच्या वाहनाची जोरदार धडक झाली. सदर कंटेनर नागपूरवरून देगलूर, जि. नांदेड कडे समृध्दी मार्गाने प्लॅस्टो कंपनीच्या पाण्याच्या टाक्यांची वाहतूक करीत होता. प्राथमिक माहितीनुसार, कंटेनर धावत्या लेनच्या बाहेर उभा असला तरी तो 'नो पार्किंग झोन'मध्ये उभा करण्यात आला होता. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून त्याबाबत पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस स्टेशन दत्तापूरचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय, दत्तापूर येथे हलविण्यात आले असून मृतांच्या नातेवाईकांना घटनेची माहिती देण्यात आली आहे. या प्रकरणी पोलीस स्टेशन दत्तापूर येथे गुन्हा नोंदविण्यात आला असून, अपघाताच्या नेमक्या कारणाचा तपास सुरू आहे.

### मृतकांमध्ये यांचा आहे समावेश

भास्कर महादेव जीवने (४०) (चालक), महादेव शिवाजी जीवने (६५)(चालकाचे वडील), लताबाई महादेव जीवने (६०) (चालकाची आई), आरती भास्कर जीवने (३८) (चालकाची पत्नी) आणि तृषा भास्कर जीवने (१२) (चालकाची मुलगी) सर्व रा. शासकीय डी.एड. महाविद्यालयाजवळ, बाबपेठ, चंद्रपूर. आदींचा समावेश आहे.

## अल्पवयीन मुलीचा बालविवाह पतीसह आई-वडिलांवर गुन्हा

### गर्भधारणा झाल्यानंतर वैद्यकीय तपासणीत उघड

प्रतिनिधी २९ जून

**मलकापूर:** अल्पवयीन मुलीचा (१७ वर्षीय) बालविवाह लावून दिल्याचा प्रकार गर्भधारणेनंतर उघडकीस आला. या प्रकरणी मलकापूर शहर पोलिसांनी पतीसह मुलीच्या आई-वडिलांविरुद्ध २७जून रोजी पोक्सो कायदा आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील १७ वर्षीय मुलीचा विवाह १० मे २०२५ रोजी नाशिक येथील युवकासोबत तिच्या आई-वडिलांनी लावून दिला होता. विवाहानंतर मुलगी गर्भवती राहिली.

ती सोनोग्राफी व उपचारासाठी मलकापूर उपजिल्हा रुग्णालयात आली असता, वैद्यकीय तपासणीत तिचे वय १७ वर्षे ३ महिने असल्याचे निष्पन्न झाले. रुग्णालयाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी पीडितेचा जबाब नोंदवून पती तसेच तिच्या आई-वडिलांविरुद्ध पोक्सो कायदा आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला.

प्रकरणाचा पुढील तपास मलकापूर शहर पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक सतीश बेले करीत आहेत.

## औद्योगिक व व्यापारी समस्यांच्या निराकरणासाठी पाठपुरावा करणार : खासदार खंडेलवाल

प्रतिनिधी २९ जून

**अकोला :** अकोला जिल्ह्यात औद्योगिक व व्यापारी क्षेत्र राष्ट्रीय स्तरावर गतिमान व्हावे यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचे मत नवी दिल्ली येथील खासदार व कॅटचे राष्ट्रीय सरचिटणीस प्रवीण खंडेलवाल यांनी व्यक्त केले.

विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीची ९२ वी वार्षिक आमसभा रविवारी पोलीस लॉन येथे संपन्न झाली. यात ते मार्गदर्शन करीत होते.




चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या अध्यक्षतेत आयोजित आमसभेत प्रमुख पाहुणे कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतीया, खासदार अनुप धोत्रे उपस्थित होते. यावेळी मंचावर चेंबरचे मानद सचिव निरव वोरा, निवर्तमान अध्यक्ष नितीन खंडेलवाल, वरिष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटीया, कनिष्ठ उपाध्यक्ष निखिल अग्रवाल, कोषाध्यक्ष किशोर बाछुका, सहसचिव किरीट मंत्री आदी उपस्थित होते.

दोन सत्रात झालेल्या आमसभेच्या प्रथम सत्रात मागील आमसभेचा कार्य वृत्तांत किरीट मंत्री यांनी वाचून दाखविला. २०२६ -२७ चा अर्थसंकल्प कोषाध्यक्ष किशोर बाछुका यांनी सादर केला. या सत्रात वर्ष २०२६ -२७ साठी अंकेक्षक म्हणून सीए प्रशांत लोहिया यांची नियुक्ती करण्यात आली. यानंतर निवडणूक अधिकारी रमाकांत खंडेलवाल यांच्याद्वारे वर्ष २०२६- २८ साठी नवीन कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. नव्या कार्यकारिणीत अध्यक्षपदी निरव वोरा, वरिष्ठ उपाध्यक्षपदी सिद्धार्थ रुहाटीया, कनिष्ठ उपाध्यक्ष किशोर बाछुका, सचिव निलेश अग्रवाल, कोषाध्यक्ष म्हणून श्रीकांत गोयनका, सहसचिव संतोष छाजेड यांची सर्वानुमते निर्विरोध निवड करण्यात आली. या नंतर द्वितीय सत्र प्रारंभ झाले. या सत्राचा प्रारंभ स्व ब्रजलाल बियाणी यांच्या प्रतिमा पूजन व दीप प्रजवलनाने मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. कार्यक्रमात विविध संस्था संघटनने खा. खंडेलवाल व भरतीया यांचे स्वागत केले. यावेळी समर्पित उद्योजक व व्यापाऱ्यांचा अवार्ड कार्यक्रम विविध श्रेणीत संपन्न झाला.

## नागपूरवरून जळगावकडे जाणारी खासगी बस उलटली !

प्रतिनिधी २९ जून

**बुलडाणा :** नागपूरहून जळगावकडे प्रवासी घेऊन निघालेल्या एका खासगी बसला नांदुऱ्याजवळ भीषण अपघात होऊन ती उलटली. यामध्ये दहा ते बारा प्रवासी गंभीर जखमी झाल्याची माहिती असून, नांदुरा बाह्यवळण मार्गावर हा अपघात घडला आहे.



प्राप्त माहितीनुसार, आज सकाळच्या सुमारास नागपूरहून जळगावकडे एक खासगी प्रवासी बस सुसाट वेगात निघाली होती. अचानक नांदुरा बाह्यवळण मार्गावर ही खासगी बस उलटली. या अपघातात दहा ते बारा प्रवासी गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. यातील जखमींना स्थानिक नागरिकांच्या व पोलिसांच्या मदतीने बाहेर काढून त्यांना उपचारार्थ रूग्णालयात हलविण्यात आले आहे. सध्या जखमींवर नांदुरा व खामगाव येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, घटनेची माहिती महामार्ग पोलिसांना मिळताच जखमींना तत्काळ मदत करण्यात आली.

## पाईपलाईन कामाचा नागरिकांना फटका बोंदरखेड ते सांगळूद रस्त्याची ऐशीतैशी





प्रतिनिधी २९ जून

**अकोला:** गट ग्रामपंचायत शिसा-बोंदरखेड अंतर्गत बोंदरखेड ते सांगळूद या दोन किलोमीटर अंतराच्या रस्त्याची पाणीपुरवठा पाइपलाईनच्या कामामुळे मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. पाइपलाईन टाकण्यासाठी करण्यात आलेल्या खोदकामानंतर रस्त्याची योग्य पद्धतीने दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पावसामुळे रस्त्यावर चिखल, व पाणी साचत असल्याने वाहनधारक तसेच पादचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. संबंधित कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे रस्त्याची ही अवस्था निर्माण झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात असून, अपघाताचा धोका वाढला आहे. पाइपलाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता पूर्ववत करणे ही संबंधित कंत्राटदाराची जबाबदारी असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. प्रशासनाने व संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन पाइपलाईनचे काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे तसेच रस्त्याची त्वरित दुरुस्ती करावी, अशी मागणी बोंदरखेड व सांगळूद परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## महिला व बालकल्याण विभागाचा पदभार स्वीकारण्या आधीच जीवने मॅडमची दुर्दैवी एक्झिट

प्रतिनिधी २९ जून

**अकोला:** अकोला जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर एक आठवड्यातच परत येईल असे आश्वासन देऊन चंद्रपूरहून अकोल्याकडे निघालेल्या आरती जीवने मॅडम त्यांच्या गाडीला समृद्धी महामार्गावरील दत्तापूर नजीक कंटेनरला धडकल्याने झालेल्या अपघातात आरती जीवने सह त्यांच्या परिवारातील चौघांचा घटनास्थळीच करून अंत झाला.

या अपघातात आरती जीवने सह त्यांचे पती भास्कर जीवने, सासरे महादेव जीवने, सासू लताबाई जिवने, आणि त्यांची बारा वर्षाची मुलगी तृषा जीवने यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. आठवड्या भरात परत येईल... पण त्या आता कधीच परत येणार नाहीत अलका जीवने यांचे पती भास्कर जीवने चंद्रपूर येथे वेकोफी मध्ये कार्यरत आहेत पत्नीच्या बदलीमुळे त्यांनी दोन दिवसाची सुट्टी घेतली होती ही सुट्टी त्यांच्या आयुष्यातील शेवटची ठरेल याची कोणी कल्पनाही केली नव्हती एक कुटुंब नवीन स्वप्न घेऊन घर सोडून निघाले होते परंतु समृद्धी महामार्गावरील अपघाताने ती सर्व स्वप्ने उध्वस्त केली.



अकोला जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागात आरती जुने यांची बदली झाली होती कुटुंबासाठी ही एका नव्या सुरुवातीची संधी होती पण नियतीने वेगळाच डाव साधला होता आज सोमवारी २९ जून रोजी त्या पदभार स्वीकारणार होत्या हा आनंदाचा क्षण अनुभवण्यासाठी संपूर्ण कुटुंब एकत्र निघाले होते परंतु समृद्धी महामार्गावर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका नादुरुस्त ट्रकने दुर्दैवाने संपूर्ण कुटुंबाचा बळी घेतला.

अकोला जिल्हा परिषदेच्या महिला आणि बालकल्याण विभागातील झालेली बदली आणि पद त्यांना मान्य नव्हते परंतु नाखुशीने त्यांनी पदभार ग्रहण करण्याचा निर्णय घेतला होता परंतु तो सुद्धा नियतीला मान्य नसल्याचे दिसून आले.

## अवैध सावकारांच्या पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता करा

### आमदार हरीश पिंपळे यांनी सभागृहात उठवला आवाज

प्रतिनिधी २९ जून

**मूर्तिजापूर :** अमरावती आणि अकोला जिल्ह्यासह महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या व्यथा आमदार हरीश पिंपळे यांनी पावसाळी अधिवेशनात सभागृहा समोर मांडल्या. सरकार सांगते की जिल्ह्यात परवानाधारक सावकार आहेत, पण हजारो शेतकऱ्यांना अवैध (विना-परवाना) सावकारांकडून अवाच्या सव्वा व्याजाने कर्ज घ्यावे लागत आहे. हे अवैध सावकार चिठ्ठीवर व्यवहार करतात, कोणताही हिशोब ठेवत नाहीत आणि शेतकऱ्यांचे शोषण करतात. अवैध सावकारांच्या पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता होणे आवश्यक आहे. या अवैध सावकारांवर आळा घालण्यासाठी आणि शेतकऱ्यांना तक्रार करता यावी यासाठी 'राज्यव्यापी हेल्पलाईन नंबर' सुरू करावा, अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली. अवैध सावकारांच्या त्रासातून शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी राज्यव्यापी हेल्पलाईन सुरू करणार का?, शेतकऱ्यांना विश्वासात न घेता पुनर्गठन करून त्यांना अडचणीत आणणाऱ्या बँकांवर कारवाई होणार का?, अवैध सावकारी पूर्णपणे मोडीत काढण्यासाठी सरकार काय पावले उचलणार? हे महत्त्वाचे प्रश्न सभागृहात उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधून घेतले.




शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आपला संघर्ष असाच सुरू राहील असा निर्धार देखील त्यांनी व्यक्त केला. अवैध सावकारांच्या पाशात पश्चिम विदर्भातील शेतकरी अडकला आहे. त्याची मुक्तता झाली तर अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतील. कारण सावकारांच्या जाचामुळे शेतकरी समस्यांना सामोरे जात आहे. आमदार हरीश पिंपळे यांनी या विषयावर नेहमी आवाज उठवला तसेच जुलमी पाशातून शेतकऱ्यांची सुटका व्हावी म्हणून या पावसाळी अधिवेशनात त्यांनी महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

सोमवार, दि. २९ जून २०२६

https://epaper.citynewssuperfast.com

## पहिलाच पाऊस अन् नेरमध्ये घरात नाले

प्रतिनिधी २९ जून

**नेर :** शहरात झालेल्या पहिल्याच मुसळधार पावसाने वलीसाबनगर आणि शहादानगर परिसरातील नागरिकांच्या अडचणीत मोठी भर पडली. या परिसरात पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी नाल्यांची व्यवस्था नसल्याने नाल्याचे आणि सांडपाण्याचे पाणी थेट घरांमध्ये शिरले. यामुळे १० ते १२ घरांचे नुकसान झाले आहे. मुसळधार पावसामुळे सर्वाधिक फटका रवी पवार यांच्या घराला बसला. त्यांच्या घरातील धान्य, जीवनावश्यक वस्तू, कपडे, फर्निचर तसेच अन्य साहित्य भिजून नुकसान झाले. अबरार खान, इलियास पठाण, शेख फारूक, अब्दुल शोहेब, फिरोज शहा, शेख अमीर आणि जुनेद खान यांच्या घरातही पावसाचे व नाल्याचे पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाल्याची माहिती मिळाली.

मागील २० वर्षांपासून या परिसरात नाल्यांची व पक्क्या रस्त्यांची सुविधा उपलब्ध नाही. प्रत्येक पावसाळ्यात हीच परिस्थिती निर्माण होते. राष्ट्रीय मुस्लीम मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रजा शेख, तालुका अध्यक्ष शारीक शेख यांनी घटनास्थळी भेट देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.

# अतिक्रमण हटेपर्यंत उपोषण सुरूच

### सार्वजनिक बांधकाम अधिकाऱ्यांना उपोषण मंडपातून परतावे लागले

प्रतिनिधी २९ जून




**उमरखेड :** शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील स्मारकाच्या अनावरणास अडथळा ठरत असल्याचा आरोप असलेल्या भारत पेट्रोल पंपावरील कथित अतिक्रमण हटवून स्मारकाचे तातडीने सन्मानपूर्वक अनावरण करण्यात यावे, या मागणीसाठी जिजाऊ ब्रिगेडच्या सरोजिनी देशमुख यांचे आमरण उपोषण चौथ्या दिवशीही सुरूच राहिले. प्रशासनाच्या विनंतीनंतरही त्यांनी उपोषण मागे घेण्यास नकार देत, 'अतिक्रमण हटल्याशिवाय माघार नाही,' अशी ठाम भूमिका घेतली.

रविवारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता महेश माथुरकर यांनी कर्मचाऱ्यांसह उपोषणस्थळी भेट देऊन सरोजिनी देशमुख यांची भेट घेतली.

यावेळी माजी आमदार किसनराव वानखेडे उपस्थित होते. संबंधित पेट्रोल व डिझेलच्या भूमिगत टाक्या स्फोटक पदार्थांच्या श्रेणीत येत असल्याने त्या हटविण्यासाठी संबंधित विभागांची परवानगी आणि आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आठ दिवसांचा अवधी द्यावा, अशी विनंती अधिकाऱ्यांनी केली.

मात्र, सरोजिनी देशमुख यांनी ही मागणी फेटाळून लावत, जोपर्यंत कथित अतिक्रमण हटविले जात नाही आणि स्मारकाच्या अनावरणाबाबत ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहील, असे स्पष्ट केले.

छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या अनावरणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, कथित अतिक्रमण हटविण्यासाठी शिवप्रेमींनी यापूर्वी अनेक आंदोलने, निवेदने व पाठपुरावा केला आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने अखेर आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारण्यात आल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

दरम्यान, प्रशासनाच्या भूमिकेबाबत नागरिकांमध्येही नाराजी व्यक्त होत असून, कथित अतिक्रमणावरील कारवाईस विलंब का होत आहे, याचे स्पष्टीकरण देण्याची मागणी होत आहे.

स्मारकासारख्या अस्मितेच्या विषयावर प्रशासनाने अधिक गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### प्रशासनाचे लेखी आश्वासन; उपोषण मागे घेण्याचे आवाहन

- छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील कथित अतिक्रमणाबाबत संबंधित विभागांशी आवश्यक पत्रव्यवहार करण्यात आला असून, पुढील एका आठवड्यात संयुक्त पाहणी, मोजणी व हद्द कायम करण्याची कार्यवाही केली जाईल, असे सार्वजनिक बांधकाम विभागाने सरोजिनी देशमुख यांना दिलेल्या लेखी पत्रात नमूद केले आहे. यासाठी उपअधीक्षक, भूमी अभिलेख उमरखेड, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचे अधिकारी तसेच विस्फोटक नियंत्रक, वर्धा यांच्याशी संपर्क साधण्यात आल्याचे पत्रात म्हटले आहे. या प्रक्रियेस सहकार्य करून आमरण उपोषण मागे घ्यावे, असे आवाहन प्रशासनाने केले असून, संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रतीही देण्यात आल्या आहेत.

# कारमधून अवैध विदेशी दारूची तस्करी : दोघे जेरबंद

प्रतिनिधी २९ जून



**यवतमाळ :** पांढरकवडा पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत अवैध विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून १ लाख ८ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. २८) दोन व्यक्ती सिल्व्हर रंगाच्या मारुती सुझुकी अल्टो कारमधून पांढरकवडाहून अर्ली गावाकडे विक्रीसाठी विदेशी दारू घेऊन जात असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने पाटणबोरी येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील आरटीओ तपासणी नाक्यावर सापळा रचला.

यावेळी अजय देवराव तुमाने (वय २९, रा. घुबडी, ता. केळापूर) व सुरेश भास्कर ओसावार (वय ४४, रा. अर्ली, ता. केळापूर) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या एमएच-२९ एआर-२६५३ क्रमांकाच्या कारच्या डिकीत ५० बाटल्या ऑफिसर्स चॉइस ब्ल्यू, २० बाटल्या रॉयल स्टॅग तसेच दोन लिटर क्षमतेची एक प्लास्टिक बाटली असा एकूण १८ हजार २५० रुपयांचा विदेशी मद्यसाठा आढळून आला. याशिवाय ९० हजार रुपये किमतीचे वाहनही जप्त करण्यात आले.

या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (अ) व (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे, पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशीर तसेच पांढरकवडा पोलिसांच्या पथकाने केली.

# मदन येरावार, डॉ.श्रीधर देशपांडे, प्रा.डॉ.विवेक विश्वरूपे विदर्भ साहित्य संघ, यवतमाळच्या मार्गदर्शकपदी

प्रतिनिधी २९ जून

**यवतमाळ :** विदर्भ साहित्य संघाच्या यवतमाळ शाखेच्या नुकत्याच झालेल्या कार्यकारिणीच्या सभेत येथील माजी मंत्री मदन येरावार, सामाजिक कार्यकर्ते डॉ. श्रीधर देशपांडे, सेवानिवृत्त प्रा. डॉ. विवेक विश्वरूपे यांची मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

माजी मंत्री मदन येरावार यांनी यवतमाळच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनात स्वागताध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडली होती.

डॉ. श्रीधर देशपांडे यांनीही अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. तसेच इंग्रजी-मराठी तौलनिक साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. विश्वरूपे यांनी दहा वर्षे विदर्भ साहित्य संघाच्या यवतमाळ शाखेचे सचिव म्हणून काम पाहिले. तसेच यवतमाळमधील साहित्यिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात तिघांचेही लक्षणीय कार्य आहे. त्यांच्या साहित्य व संघटनात्मक क्षेत्रातील अनुभवाचा कार्यकारी मंडळाला उपयोग होणार आहे.

केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य व पदाधिकारी विवेक कवठेकर व डॉ. देवेंद्र पुनसे तसेच शाखाध्यक्ष डॉ. सतपाल सोवळे, उपाध्यक्ष ॲड जीवन पाटील, नितिन पखाले, सचिव प्रा. डॉ. ताराचंद कंठाळे, सहसचिव धनंजय पांडे, विद्या खडसे, कोषाध्यक्ष प्रा. अतुलकुमार सारडे, अनिरुद्ध पांडे, डॉ. ललिता घोडे, प्रा. विनोद भगत, मोरेश्वर पुंडशास्त्री यांनी त्यांच्या नियुक्तीबद्दल आनंद व्यक्त केला.

# जीव धोक्यात घालून नागरिकांची नदीपात्रातून ये-जा

### मुसळधार पावसामुळे पिपळगाव-आसेगाव देवी मार्ग बंद

प्रतिनिधी २९ जून



**यवतमाळ :** बाभुळगाव तालुक्यातील आसेगाव देवी परिसरात मुसळधार पाऊस पडला. त्यामुळे पिपळगाव ते आसेगाव देवी या मार्गावरील पुलावरून पाण्याचा वेगाने प्रवाह सुरू झाल्याने वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली. पुलाची उंची कमी असल्याने पाणी थेट पुलावरून वाहू लागले. तसेच पुलाखाली झाडांच्या फांद्या व इतर कचरा अडकल्याने पाण्याचा निचरा मंदावून परिस्थिती अधिक गंभीर झाली. दरम्यान, काही नागरिकांनी जीवाची पर्वा न करता पुलावरून वाहणाऱ्या पाण्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. घटनास्थळी नागरिकांनी गर्दी केली होती.

स्थानिक नागरिकांनी पुलाखाली अडकलेला कचरा तातडीने हटविण्याची तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी पुलाची उंची वाढविण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. प्रशासनाने नागरिकांना पाण्याचा प्रवाह सुरू असताना पुलावरून जाण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पल्स पोलिओ : जिल्ह्यात ९०.२४ टक्के बालकांचे लसीकरण

प्रतिनिधी २९ जून




**यवतमाळ :** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत जिल्ह्यात रविवारी २ लाख ७ हजार ३९१ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात आले. हे प्रमाण अपेक्षित लाभार्थ्यांच्या ९०.२४ टक्के इतके आहे.

मोहिमेचे जिल्हास्तरीय उद्घाटन उपकेंद्र लासिना, प्राथमिक आरोग्य केंद्र सावरगड येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पाच वर्षांखालील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला.

पालकांनी प्रत्येक पात्र बालकाला पोलिओ लसीचे दोन थेंब देऊन पोलिओमुक्त समाज घडविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. प्रशांत घोडाम, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. क्रांतिकुमार नावंदीकर, सरपंच ज्योती दुधे, वैद्यकीय अधिकारी डॉ. मंगल पवार, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. स्मिता पेटकर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. प्रिती दुधे यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ उपस्थित होते.

जिल्ह्यातील २ लाख २९ हजार ८३२ अपेक्षित लाभार्थ्यांसाठी २ हजार ७१४ लसीकरण बूथ, १६५ ट्रान्झिट पथके, ११३ मोबाईल पथके आणि ५७७ पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले होते. उर्वरित बालकांना ग्रामीण भागात तीन दिवस, तर शहरी भागात पाच दिवस घरोघरी जाऊन पोलिओ लसीचा डोस देण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.

# नाजिया इलाही खान यांच्यावर कारवाई करा

### भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे उमरखेड पोलिसांना निवेदन

प्रतिनिधी २९ जून

**उमरखेड :** प्रेषित हजरत मोहम्मद (स.) तसेच त्यांच्या कुटुंबीयांविषयी कथित आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप असलेल्या नाजिया इलाही खान यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या वतीने उमरखेड पोलीस ठाण्यात देण्यात आले.

भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी जमाल सिद्दीकी यांनी नागपूर येथे व्यक्त केलेल्या भूमिकेच्या अनुषंगाने जिल्हा उपाध्यक्ष रहेमत जागीरदार यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष अतीक मौलाना तसेच महिला मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षा अंजुम परवीन यांनी मार्गदर्शन केले. निवेदनात नाजिया इलाही खान यांच्या कथित वक्तव्यांमुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रेषित हजरत मोहम्मद (स.) यांच्याविषयी समाजात मोठी श्रद्धा असून, त्यांच्याबाबत कोणतेही आक्षेपार्ह वक्तव्य सहन केले जाणार नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणात संबंधितांविरोधात तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या वतीने करण्यात आली.

यावेळी सय्यद मुसा, सादिक ठेकेदार, इस्माईल बाबा, जावेद खान, अत्ताउल्लाह खान, इम्रान खान, नासिर शेख, हमीद खान, सय्यद वसीम, अथरुद्दीन खतीब, सय्यद राजिक, शेख रहीम यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# SIR प्रक्रियेबाबत जनजागृतीसाठी संविधान जागर अभियान मैदानात

प्रतिनिधी २९ जून



**यवतमाळ :** विशेष मतदार पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी संविधान जागर अभियान व सामाजिक संस्थांच्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी ३० जूनपासून महाराष्ट्रासह १६ राज्यांमध्ये सुरू होणाऱ्या SIR प्रक्रियेत नागरिकांना सहकार्य करण्याची भूमिका जाहीर करण्यात आली.

पत्रकार परिषदेत सांगण्यात आले की, मतदानाचा अधिकार हा भारतीय लोकशाहीचा मूलभूत आधार असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नांमुळे सर्व प्रौढ नागरिकांना समान मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे. त्यामुळे मतदार यादी अचूक व अद्ययावत राहण्यासाठी निवडणूक आयोगाच्या SIR प्रक्रियेला सहकार्य करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

संविधान जागर अभियानाच्या वतीने नागरिकांना SIR प्रक्रियेची माहिती देणे, बूथस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करणे, ज्येष्ठ व अशिक्षित नागरिकांना मदत करणे, हेल्पडेस्क उभारणे आणि ग्रामसभांमधून जनजागृती करणे असे विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. २६ जून रोजी झालेल्या बैठकीत सामाजिक कार्यकर्ते व इच्छुक नागरिकांसाठी SIR प्रक्रियेवर प्रशिक्षण सत्र आयोजित करण्याचाही निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. नागरिकांनी स्वतः SIR प्रक्रियेची माहिती घेऊन आपल्या परिसरात जनजागृती मोहीम राबवावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

पत्रकार परिषदेला प्रा. घनश्याम दरणे, निश्चय, ॲड. जयसिंग चव्हाण, गायकवाड, ॲड. सीमा तेलंगे, शोभाताई पारधी, शशिकांत खडसे, दत्तूभाऊ पारधी, डॉ. दिलीप पारधी व उदय सरताबे उपस्थित होते.

# यवतमाळच्या दृष्टिहीनांची 'दिव्यांग पायी वारी' पंढरपूरकडे प्रस्थान करण्यासाठी सज्ज!

प्रतिनिधी २९ जून

**यवतमाळ :** 'माऊली... माऊली...' हा गजर दरवर्षी आषाढीला अवघ्या महाराष्ट्राला कवेत घेतो. डोळ्यांत विठूरायाच्या दर्शनाची आस घेऊन लाखो वारकरी पंढरीची वाट चालतात. पण, ज्यांच्या नशिबात हे जग पाहण्याचे सुख नाही, ज्यांच्या डोळ्यांसमोर फक्त अंधार आहे, ते जेव्हा पंढरीची वाट धरतात, तेव्हा ही वारी भक्ती, जिद्द आणि आत्मविश्वासाचा एक अभूतपूर्व सोहळा ठरते.

महाराष्ट्राच्या इतिहासात यवतमाळकरांनी कोरलेला दिव्यांग वारीचा हा सुवर्ण क्षण पुन्हा एकदा अनुभवता येणार आहे. सेवा समर्पण प्रतिष्ठान ट्रस्ट, यवतमाळ अंतर्गत दिव्यांग सेवा समिती द्वारा 'संत सूरदास महाराज दिव्यांग (अंध) पायी वारी २०२६' चे यंदा ४ जुलै रोजी यवतमाळून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. या वारीचे हे तिसरे वर्ष आहे. जगाला डोळे उघडूनही न दिसणारा तो सावळा विठ्ठल, या दृष्टिहीन माऊलींना अंतर्मनाने दिसणार आहे.

ज्यांना चालताना काठीचा आधार घ्यावा लागतो, ते दिव्यांग बांधव आणि भगिनी यवतमाळ ते पंढरपूर असा तब्बल ५२१ किलोमीटरचा टप्पा पायी पार करणार आहेत. वाटेत २२ गावांचे थांबे घेत, भेगाळणाऱ्या पायांची तमा न बाळगता, केवळ आणि केवळ विठ्ठल नामाच्या गजर करत ही पाऊले पुढे पडणार आहेत. शनिवार, ४ जुलै रोजी सकाळी ७:३० वाजता यवतमाळ येथील सरोज टॉकीज जवळील रुक्मिणी पांडुरंग संस्थान येथून या वारीचे भक्तिमय वातावरणात प्रस्थान होणार आहे.

४ जुलै रोजी यवतमाळवरून निघणारा हा दिंडी सोहळा रोज नवनवीन गावा पार करत २५ जुलैला विठूरायाच्या दारी पोहोचेल. वारीचा २२ गावात मुक्काम राहणार आहे. हिवरी, आर्णी, दिग्रस, पुसद, शेंबाळपिंपरी, कळमनुरी, हिंगोली, औंढा नागनाथ, हट्टा, परभणी, पोकर्णी, गंगाखेड, परळी वैजनाथ, आंबेजोगाई, पावनधाम, कळंब, येरमाळा, बार्शी, कुर्डूवाड, शेटफळ, रोपडे असा प्रवास करत ही दिंडी २५ जुलै रोजी पंढरपूर येथे ही दखल होऊन विठ्ठल दर्शन दर्शन घेणार आहे. या अंध माऊलींच्या प्रवासाची, त्यांच्या राहण्याची आणि खाण्यापिण्याची सोय महाराष्ट्रातील संवेदनशील अन्नदात्यांनी आणि यजमानांनी आनंदाने उचलली आहे. प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या गावातील दानशूर व्यक्ती आणि संस्था या दिव्यांग वारकऱ्यांच्या सेवेसाठी सज्ज आहेत. हे

सन २०२४ मध्ये दिव्यांगांनी पहिली पायी वारी काढून महाराष्ट्राच्या इतिहासात यवतमाळचे नाव सुवर्णअक्षरांनी कोरले होते. तोच वारसा पुढे चालवत सेवा समर्पण ट्रस्टचे अध्यक्ष आणि वारी संयोजक प्रशांत विश्वनाथराव बनगीनवार आणि प्राची प्रशांत बनगीनवार यांच्यासह संस्थेचे उपाध्यक्ष सुरेश राठी, डॉ. आलोक गुप्ता, सचिव अनंत कौलगिकर, कोषाध्यक्ष दीपक बागडी आणि दिव्यांग सेवा प्रकल्पाची संपूर्ण टीम या सोहळ्याच्या नियोजनात अहोरात्र झटत आहे. अंध मुलांचा कर्णधार प्रज्वल तुमसरे आणि अंध मुलींची कर्णधार सोनम ठाकरे यांच्या खांद्यावर वारीच्या नेतृत्वाची जबाबदारी आहे.

दिव्यांग माऊलींना निरोप देण्यासाठी आणि त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी यवतमाळकरांनी ४ जुलैला सकाळी रुक्मिणी पांडुरंग संस्थान येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# डोंगरखर्डा-किनवट रस्त्याचे काम रखडले




### ठेकेदाराच्या मनमानीमुळे नागरिक हैराण

प्रतिनिधी २९ जून

**कळंब :** तालुक्यातील डोंगरखर्डा ते किनवट या महत्त्वाच्या मार्गाचे काम गेल्या सहा महिन्यांपासून रखडल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे आणि जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे संताप व्यक्त केला जात आहे.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत या मार्गाचे सिमेंट रस्त्यात रूपांतर करण्यात येत असून, रस्त्याची रुंदी तीन मीटरवरून वाढविण्यासाठी दोन्ही बाजूंना सुमारे ५० सेंटीमीटर गिट्टी टाकण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मात्र, काम सुरू झाल्यानंतर ठेकेदाराने रस्त्याच्या कडेला तीन फूट खोल खोदकाम करून माती तशीच टाकून ठेवल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे.

सध्या पावसाळ्यामुळे या मार्गावर दोन वाहने एकाचवेळी जाऊ शकत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. या रस्त्यावरून राळेगाव आगाराच्या बसेस धावत होत्या. मात्र, खराब झालेल्या रस्त्यामुळे काही दिवसांपासून बससेवा बंद करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या मार्गावरील बससेवा बंद झाल्याने परिसरातील ४० ते ५० गावांतील नागरिकांवर त्याचा परिणाम झाला आहे. ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे नागरिकांचे हाल होत असताना संबंधित बांधकाम विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### ४० ते ५० गावांचा संपर्क विस्कळीत

- डोंगरखर्डा-किनवट मार्गावरील बससेवा बंद झाल्यामुळे परिसरातील सुमारे ४० ते ५० गावांतील नागरिकांचा दैनंदिन प्रवास विस्कळीत झाला आहे. विद्यार्थी, शेतकरी आणि व्यावसायिकांना पर्यायी वाहतुकीसाठी अतिरिक्त खर्च करावा लागत असून, प्रशासनाने तातडीने लक्ष घालण्याची मागणी होत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय द्वारा ॲड राजेश शहा बिल्डींग (लाला बिल्डींग समोर ) अवधूतवाडी यवतमाळ ता. जि. यवतमाळ येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135